भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १०.०७.२०१९ ते १४.०७.२०१९)

| अंक ५५/२०१९ | दिनांक ०९.०७.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०३/०७/२०१९ ते ०९/०७/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १०/०७/२०१९ ते १४/०७/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | ०८/०७ | ०९/०७ | दिनांक | १०/०७ | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ |
| ५१.३ | २१.० | ५८.४ | ५६.३ | ४०.१ | २७.३ | १८.८ | पाऊस (मि. मी) | ३८ | ४४ | ४० | ४५ | ४० |
| ३२.० | ३०.० | ३१.० | ३१.० | ३०.५ | ३१.० | ३१.० | कमाल तापमान (अं. से) | ३१ | ३१ | ३१ | ३० | ३० |
| २३.० | २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ८ | ७ | ८ | ८ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९५ | ९२ | ८५ | ८५ | ८५ | ९२ | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८९ | ९१ | ९१ | ९२ | ९२ |
| ७४ | ७८ | ८५ | ७८ | ७८ | ७६ | ७२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ७९ | ८२ | ८२ | ८२ |
| २.९ | २.६ | ४.२ | ४.४ | ५.७ | ४.५ | ५.१ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०१७ | ०१५ | ०१४ | ०११ | ०१२ |
| नैऋत्ये | स्थिर | दक्षिणे | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | नैऋत्ये कडून | नैऋत्ये कडून | नैऋत्ये कडून | नैऋत्ये कडून | नैऋत्ये कडून |
| दक्षिणे | दक्षिणे | नैऋत्ये | दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | नैऋत्ये | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ११८२.५ | ११८२.५ | २७३.२ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पुर्नलागवड | पाणी निचरणा-या शेतात तणांचा उपद्रव कमी करण्यासाठी ब्युटॅक्लोर तणनाशकाचा प्रती गुंठा ३० मिलि ५० ई.सी. ब्युटॅक्लोर ६लिटर पाणी याप्रमाणात लागवडीनंतर ४ दिवसांनी मागे सरत फवारावे. तणनाशक वापरानंतर शेतातील पाणी बांधुन ठेवावे. पाऊसाची ऊघडीप पाहूनच तणनाशक फवारावे.<br>या आठवड्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी भात पिक २० ते २५ दिवसांच्या रोपांच्या अवस्थेत आहे. शेतक-यांनी पुर्नलागवडीची कामे हाती घ्यावीत व ती लवकरात लवकर पुर्ण करावीत. पुर्नलागवडीसाठी रोपे १० ते १५ सेमी ऊंचीची, ५-६ पाने फुटलेली व २०-२२ दिवसांची असावीत. शेवटच्या चिखलणीच्यावेळी प्रती गुंठा क्षेत्रास ८७० ग्रम युरीया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व ८३० ग्रम म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणात खते द्यावीत. हिरवळीच्या खतासाठी गिरीपुष्पाचा पाला हेक्टरी १० टन याप्रमाणे (१०० किलो प्रती गुंठा) लावणीपुर्वी शेतात गाडल्यास नत्राच्या मात्रेत बचत करता येते. भाताची लावणी जमिनीच्या मगदुरानुसार हळव्या जातींसाठी १५ x १५ सेमी (४४ चुडे प्रती चौ.मी.) आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २० x १५ सेमी (३३ चुडे प्रती चौ.मी.) अंतर ठेवावे. लावणी सरळ व ऊथळ करावी. संकरीत भातासाठी एकाठिकाणी एकच जोमदार रोप लावावे. भात लागवडीसाठी चारसुत्री लागवड पद्धतीचा अवलंब करावा. भात खाचरात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.<br>काही ठिकाणी भात पिक १५ ते २० दिवसांच्या रोपांच्या अवस्थेत आहे. अश्या ठिकाणी शेतक-यांनी पुर्नलागवड करण्यासाठी शेतामध्ये नांगरणी व चिखलणी करण्यास सुरुवात करावी. त्यासाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या पंकज चिखलणी यंत्राचा वापर करावा.<br>पुर्नलागवडीसाठी व पुर्नलागवड केलेल्या भात पीकाला पाणी कमी पडत असल्यास बाहेरुन (नदी, नाले, विहिरि, तळी ई.) आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरवठा करावा. भात खाचरात पाणी साठवणुकीकरीता बांधबंदीस्ती करावी. |
| नागली | पुर्नलागवड | नागलीच्या रोपवाटीकेतील रोपे १५ दिवसांची झाली असल्यास रोपवाटीकेमधील तणांची बेणणी करुन युरीया या नत्रयुक्त खताचा गुंठ्यास १ किलो या प्रमाणे वापर करावा. तसेच लागवड करावयाच्या ठिकाणी ऊतारास आडवी पुर्व मशागत करावी.<br>रिमझिम पाउस पडत असताना किंवा वातावरण ढगाळ असताना नागलीची लागवड करावी. रोपे उताराच्या आडव्या दिशेने ठोंबा पद्धतीने ओळीत उथळ किंवा उभी लावावीत. अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी ३० दिवसांची रोपे एका ठोंब्यात २ याप्रमाणे दोन ओळीत २० सेमी आणि २ रोपात १५ सेमी अंतर ठेवुन लावावेत. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | भुईमुगातील तणांचा उपद्रव कमी करण्यासाठी ब्युटॅक्लोर अथवा ऑक्सीडायझॉल या तणनाशकाची प्रती हेक्टरी १.५ किंवा ०.५ किलोग्रम क्रियाशील घटकाची ५०० ते ६०० लिटर पाण्यातुन फवारणी करावी. पाऊसाची ऊघडीप पाहूनच तणनाशक फवारावे.<br>पेरणीनंतर २० दिवसांनी बेणणी करावी. भुईमुग पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. |
| आंबा | नवीन लागवड | काही ठिकाणी पाऊसाने ऊघडीप दिल्यास व आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने खाणारी अळी आणि मिजमाशीपासुन आवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी २५% प्रवाही डायमिथोएट १२ मिली किंवा ३६% प्रवाही मोनोक्रोटोफॉस ११ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची ऊघडीप पाहून फवारणी करावी.<br>येत्या ५ दिवसात मुसळधार पाऊसामुळे आंबा पिकास रासायनिक खते देण्याचे टाळावे.<br>आंबा रोपवाटीकेत रुजलेल्या आंबा बाट्यावर कलमे बांधण्याची प्रक्रिया सुरु करावी. |
| काजु | नवीन लागवड | काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| भाजीपाला | रोप | वेलवर्गीय भाजीपाला पिकात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. |
| शेती पिके | - | येत्या ५ दिवसात मुसळधार पडण्याच्य्य शक्यतेमुळे शेतीतील मशागतीची कामे उदा. पुर्नलागवड, खत व्यवस्थापन, किटकनाशक फवारणी व तणनाशक फवारणी पावसाचा अंदाज पाहून करावी. जेणेकरुन उपरोक्त कृषी निविष्ठांच्या वापराची उपयुक्तता वाढून ऊत्पादनात वाढ होईल त्याचबरोबर कृषी निविष्ठांचा अपव्यय होणार नाही. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. बळवंत ना. सावंत<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ओफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|